सं.फौ.ख.क्रं. ११३१/२०२३

सरकार –वि– गजानन रायपुरे

नि.क्र. ७ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — अंबादास हरी बाभुळकर,

वय. ५७ वर्षे, व्यवसाय — मजुरी,

राहणार – शेलाडी, ता. खामगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सरकारी वकील.**

१. न्यायालयात अनुपस्थीत असलेल्या आरोपीला मी ओळखत नाही. पोलीसांनी मला पंच म्हणून पोलीस स्टेशनला बोलविले होते. मी पोलीसांसोबत कोठेही गेलो नव्हतो. माझ्या समक्ष आरोपीविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती व काहीही जप्त करण्यात आले नव्हते. पोलीसांनी माझ्या समक्ष लिखापडी केली नव्हती व पंचनामा केला नव्हता. पोलीसांनी माझी कागदावर सही घेतली होती. मला आता घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. १ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला माहित नाही. त्याला सहीपुरता **नि.क्र.८** देण्यात येतो. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले नव्हते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे, सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली असता त्यांना परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि. १९.०८.२०२३ रोजी शेगाव येथील जिजामाता चौकात एजुकेशन संस्कार अकॅडमी या संस्थेच्या परिसरात असलेल्या टिनाच्या टपरीत पंचनामा करण्याकरीता पंच म्हणून बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पोलीसांनी टिनाच्या टपरीची पाहणी केली असता तंबाखुजन्य पदार्थ मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी लहान मुलांना तंबाखुजन्य पदार्थ विक्री करत होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी टिनाच्या टपरीची पाहणी केली असता गायछाप तंबाखुचे १० पुड्या किंमत १०० रुपये, रवाल कंपनीच्या २० तंबाखुच्यापुड्या किंमत १००/– रुपये एक ब्रिस्टोल कंपनीचा एक सिगारेटचा पॅाकेट अंदाजे किंमत ७०/– रुपये व एक फोर्स क्वेअर सिगारेटचा पॅाकीट अंदाजे किंमत ९०/– रुपये असा एकूण ३६०/– रुपयांचा मला मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुद्देमाल लहान मुलांना विक्री करत असल्यामुळे तो मुद्देमाल माझ्या समक्ष जप्त करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर माझ्या समक्ष घटनास्थळ

वजा जप्ती पंचनामा तयार करण्यात आला व तो मला वाचून दाखविण्यात आल्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, त्या संपूर्ण कारवाईचा माझा जबाब नोदंविण्यात आला. माझ्या बयाणातील अधोरेखांकीत भाग अ पोलीसांनी खोटा लिहिलेला आहे व तो खोटा का लिहिला याचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखत असून त्याला शिक्षेपासून वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्रीमती कुमकुले, वकील यांनी नाकारला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. २५.०६.२०२५ | दि. २५.०६.२०२५ |